**निशाणी क्र.१६**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२.**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| माझे नांव | : | तानाजी हरीभाऊ मते | | |
| माझे वय | : | ३४ वर्षे | व्यवसाय | : शेती |
| राहणार | : | शिंगोली | तालुका | : कळंब |
| जिल्हा | : | धाराशिव. | | |

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता श्री. अयाजोद्दीन रियाजोद्दीन यांचेमार्फत शपथेवर सुरु -**

१. सन २०२३ मध्ये मी शिंगोली येथे राहत होतो. मी शेती करत होतो. मी दुसरे पंच सचिन धोंगडे यांना ओळखतो. पोलीसांनी मला माळी वस्ती येथे पंचनाम्याकामी दिनांक २४/०८/२०२३ रोजी दुपारी ०१.०० वा. सुमारास बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच सचिन धोंगडे होते. तेथे भांडण झाल्याबद्दल आम्हाला विचारले. आम्ही त्यांना भांडण झाल्याचे सांगितले. त्यानंतर पंचनाम्यावर सह्या घेतल्या. आता मला तो पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात आले. पोलीसांनी मला तो वाचुन दाखविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.व्ही. कवडे यांच्यामार्फत-**

२. सचिन धोंगडे माझा नातेवाईक नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सख्या चुलत भावाला अनिल मानेची बहीण दिलेली आहे.

३. मी माळी वस्तीवर राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माळी वस्तीला लागुन माझी जमीन नाही. तेथे दहा पंधरा घरे असुन १५० लोकांची वस्ती आहे. मला पंचनाम्याकामी माझ्या चुलत्यांनी बोलावले होते. मला माळी वस्तीवर गेलेल्या ठिकाणाचा गट क्रमांक सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माळी वस्तीवर गेलो नाही. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अनिल माने हा माझा नातेवाईक असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

NITIN MAHADEO REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.08.12 17:31:48 +0530

दिनांक :- १२/०८/२०२६.

**( एन. एम. रेड्डी)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कळंब.
(कोर्ट क्र.२)